# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७.०१.२०२०**

**जिल्हा : सांगली**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८.०१.२०२० ते २२.०१.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३१ | ३० | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | १७ | १८ | १८ | १७ | १६ |
| ढग स्थिती (आकाश) | ० | ० | १ | १ | ३ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५६ | ५१ | ५८ | ६० | ५४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २७ | २९ | ३३ | ३३ | २८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ९ | ८ | ३ | ८ |
| वाऱ्याची दिशा | पूर्व.ईशान्य | पूर्व | पूर्व.आग्नेय | आग्नेय | पूर्व.ईशान्य |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामानशास्त्र विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक १८ व १९ जानेवारी रोजी हवामान स्वच्छ तर दिनांक २० ते २२ जानेवारी पर्यंत हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १६.० ते १८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०३ ते ०९ कि.मी. राहील. |
| सामान्य सल्ला | | ➢ किमान तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने जनावरांचे थंडीपासून संरक्षण करावे.<br>➢ भाजीपाला पिकांमध्ये ठिबक सिंचनाचा वापर करावा त्याचप्रमाणे प्लास्टिक आच्छादनाचा वापर करावा. |
| संदेश | | ➢ सांगली जिल्ह्यात दिनांक १८ व १९ जानेवारी रोजी हवामान स्वच्छ तर दिनांक २० ते २२ जानेवारी पर्यंत हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. |
| गहू | मुकुट मुळे फुटण्याची | ➢ उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकामध्ये तापमान कमी राहावे म्हणून गव्हासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा<br>➢ गहू पिकावंर मावा या किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच डायमेथोएट ३०% प्रवाही १० मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब हे बुरशीनाशक १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| मका | शाखीय वाढ | **अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :**<br>➢ रासायनिक नियंत्रण: १. आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** २. थायमेथोक्झाम १२.६ %+ लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** ३. क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>➢ कीटकनाशकाची फवारणी केल्यानंतर मका पिकाचा हिरवा चारा लगेच जनावरांना खायला देऊ नये किंवा असा चारा लगेचच सायलेज तयार करण्यासाठी वापरू नये. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ घाटे आळीच्या नियंत्रणासाठी गंध सापळे हेक्टरी ५ या प्रमाणात लावावेत. प्रभावी नियंत्रणासाठी १८.५ % एस.सी. क्लोरॲन्ट्रीनिलीपोल १०० मिली प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| भुईमुग | पेरणी | ➢ उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी त्यासाठी एस.बी.-११, टी.अे.जी.-२४ टी.जी.-२६, जे.एल.५०१, फुले उन्नती या जातींची निवड करावी. रात्रीचे किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा पेक्षा |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | जास्त असल्यावरच पेरणी करावी. पेरणीच्यावेळी हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. |
| **ऊस** | लागवड | ➢ सुरु उस लागवड १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी दरम्यान केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी. एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची ) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. काही वेळेस अगोदरचे पिक काढणीस उशीर होतो अश्या वेळेस रोपे तयार करून वेळेवर उसाची लागवड करता येते. बेण्याद्वारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळ्यात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे. |
| **कांदा** | वाढीची | ➢ कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % ई.सी. १५ मि.ली. किंवा ल्यॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी. ६ मि.ली. या कीटकनाशकांच्या प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| **काकडी** | **पेरणी** | ➢ उन्हाळी काकडीची पेरणी करण्यासाठी हिमांगी तसेच फुले शुभांगी या जातीची निवड करावी. पेरणीसाठी प्रती हेक्टरी १ ते १.५ किलो बियाणे वापरावे. |
| **आंबा** | **पालवी व मोहर** | ➢ आंबा पिकामध्ये मोहर/बोंगे फुटण्याच्या अवस्थेत तुडतुडे नियंत्रणासाठी ल्यॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ % ६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या खोडावर, फांद्यांवर व पानांवर फवारणी करावी. |
| **कलिंगड** | **लागवड** | ➢ उन्हाळी हंगामासाठी कलिंगड सुरु करावी. लागवडीसाठी शुगर बेबी, अरका माणिक, अरका ज्योती या जाती वापराव्यात. लागवडीसाठी २.५ ते ३.० किलो बियाणे प्रती हेक्टरी वापरावे. |
| **जनावरे** | **वाढीची** | ➢ थंडीची तीव्रता जास्त असल्यामुळे जनावरांच्या गोठ्यातील तसेच पोल्ट्री शेड मधील तापमान नियंत्रणासाठी गोठयाच्या बाजूने पडदे किंवा गोणपाट लावून तापमान नियंत्रित करावे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १७.०१.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**